पांडुरंग पोले
भा.प्र.से.
जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी

सत्यमेव जयते

जिल्हाधिकारी लातूर यांचे कार्यालय,
महाराष्ट्र - 413512

क्र.२०१४/एमएजी/कक्ष-१/कावी-

दिनांकः- ०५/०८/२०१४

विषयः- महसूल विभागातील अधिकारी व कर्मचारी यांच्या विविध अडचणीबाबत.

आदरणीय महोदय,

उपरोक्त विषयी आज मा. मुख्य सचिव महाराष्ट्र राज्य यांच्या व्हिडिओ कॉन्फरन्समध्ये दिलेल्या निर्देशानुसार उदयापासून होणा-या पोलिस अधिकारी यांच्या परिषदेत सादर करण्यासाठी जिल्ह्यातील उपजिल्हाधिकारी, तहसिलदार व नायब तहसिलदार संवर्गातील अधिकारी यांच्याशी झालेल्या चर्चेत क्षेत्रीय पातळीवर काम करणा-या महसूल विभागातील अधिका-यांच्या गृह विभागाशी संबधीत खालील प्रमाणे अडचणी समोर आलेल्या आहेत.

१) जिल्हाधिकारी कार्यालय, उपविभागीय अधिकारी कार्यालय व तहसिल कार्यालय या ठिकाणी महसूल व बिगर महसूली कामे या संदर्भात मोठया प्रमाणात नागरीक भेट देत असतात अलिकडे या कार्यालयामध्ये नागरीकाव्दारे या कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांना धमकावणे, शिव्या देणे किंवा धक्का बुकी करणे अशे प्रकार वाढले आहेत. दिनांक १६ जून २०१४ रोजी तहसिल कार्यालय लातूर या ठिकाणी एका शेतक-याने तहसिलदार लातूर यांच्यावर चाकूव्दारे जिवघेणा हल्ला केला होता. असे प्रकार होऊ नये म्हणून जिल्हाधिकारी कार्यालय, उपविभागीय अधिकारी कार्यालय व तहसिल कार्यालय या ठिकाणी कायमस्वरुपी एक/तीन चा हत्यारी पोलीस गार्ड बंदोबस्त कामी पूरविणे आवश्यक आहे. प्रसंग परत्वे सदर गार्ड हा अवैध गौन खनिज उत्खननास आळा घालणे, जिवनावश्यक वस्तू कायदे अंतर्गत धाडी घालणे या सारख्या क्षेत्रीय पातळीवरील कामासाठी देखील वापरता येऊ शकतो.

२) अपर जिल्हादंडाधिकारी, उपविभागीय दंडाधिकारी व कार्यकारी दंडाधिकारी यांच्या संवेदनशिल व व्यापक कामाचे स्वरुप लक्षात घेता त्यांना २४ तास हत्यारी अंगरक्षक म्हणून पोलीस गार्ड देण्यात यावा.

३) शासकीय अधिकारी कर्मचारी यांच्यावरील हल्ले, शासकीय कामकाजात अडथळा यासंदर्भात दाखल झालेल्या गुन्ह्यात तपासाचा नियतकालीक आढावा घेणे आवश्यक असून त्याव्दारे विहित मुदतीत योग्य कारवाई होत आहे याची खातरजमा करण्यासाठी जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी, पोलीस अधिक्षक व ज्या विभागाच्या अधिकारी कर्मचारी यांनी गुन्हा दाखल केला आहे त्या विभागाचे जिल्हास्तरीय विभाग प्रमुख यांची समिती स्थापन करण्यात यावी व या समितीव्दारे अशा सर्व प्रकरणांचा आढावा घेऊन पाठपुरावा करुन प्रकरणात तातडीने कार्यवाही करणे बाबत अधिकार प्रदान केले जावेत.

४) अनेक जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी शासकीय रुग्नालयामध्ये दाखल झालेल्या रूग्नांचे मृत्यू पूर्व जवाब नोंदविण्यासाठी तहसिलदार व नायब तहसिलदार यांना जावे लागते तहसिल कार्यालयाचे नियमीत

पांडुरंग पोले
भा.प्र.से.
जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी

सत्यमेव जयते

जिल्हाधिकारी लातूर यांचे कार्यालय,
महाराष्ट्र - 413512

कामकाज सांभाळून सदर काम करणे अत्यंत जिकीरीचे होत आहे. त्यामुळे ज्या जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी महापालीका अस्तीत्वात आहे त्या ठिकाणी मृत्यू पूर्व जवाब घेणे, ओळख परेड घेणे इत्यादी कामासाठी विशेष न्यायदंडाधिकारी यांची नियूक्ती करण्यात यावी.

५) तहसिल कार्यालयामध्ये ३ ते ५ नायब तहसिलदार यांचे पदे असून तहसिलदार व नायब तहसिलदारांना विविध तपासण्या, चौकश्या, धाडी इत्यादी कामासाठी क्षेत्रीय स्तरावर दौरे करावे लागतात त्यामुळे सदया मंजूर असलेले एक वाहन पूरेसे नाही त्यास्तव तहसिल कार्यालयातील सर्व नायब तहसिलदार यांच्यासाठी उपविभाग स्तरावर प्रत्येक उपविभागासाठी किमान एक अतिरिक्त वाहन मंजूर करणे आवश्यक आहे.

६) शासनाच्या अलिकडच्या निर्देशानूसार कार्यकारी दंडाधिकारी, उपविभागीय दंडाधिकारी, अपर जिल्हादंडाधिकारी व जिल्हादंडाधिकारी यांच्या वाहणावर निळया रंगाचे दिवे बसविण्यात आले आहेत. जनतेमध्ये निळया रंगाच्या दिव्यामूळे आरोग्य सेवेची वाहने व कायदा व सूव्यवस्था कामी वापरण्यात येणारी वाहने यामध्ये फरक दिसून येत नाही. त्यामुळे कायदा व सूव्यवस्था, आपत्ती व्यवस्थापन यासारखी कामे हाताळताना निळया दिव्याचा कुठलाही प्रभाव जानवत नाही त्यामुळे या संदर्भात शासन स्तरावर फेरविचार होऊन पूर्वीप्रमाणेच दंडाधिकारी यांच्या वाहनावर अंबर दिवा लावण्यात यावा.

तरी वरील शिफारसीचा गांभीर्याने विचार करुन त्यावर अमलबजावणीसाठी योग्य ते निर्देश सर्व संबंधीताना निर्गमित करावेत ही विनंती.

आपला
स्वाक्षरीत/-
**( पाडूरंग पोले )**

**प्रति,**

**मा.संजीव जयस्वाल, (भा.प्र.से.)**
**विभागीय आयुक्त,**
औरंगाबाद विभाग, औरंगाबाद

**प्रत** - उपसचिव, मा. मुख्य सचिव यांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई - 32.

**जिल्हादंडाधिकारी, लातूर**